राज्य स्तरावर औद्योगिक उत्पादन
निर्देशांक, परिगणित करणेबाबत..

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन निर्णय क्रमांक : असांसं-१३१७/१६७३/प्र.क्र.१५१/का-१४१७
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ३२
दिनांक: १६ नोव्हेंबर, २०१७

प्रस्तावना-

औद्योगिक क्षेत्रामध्ये अनेक उत्पादने असतात आणि प्रत्येक उत्पादन वेगवेगळ्या एककामध्ये मोजले जाते. औद्योगिक उत्पादनाचे निर्देशांक एकत्रितरित्या सर्व उत्पादनांचे संयुक्त परिमाण आहे. विविध औद्योगिक उत्पादनातील बदल विचारात घेण्याकरीता हे निर्देशांक तयार करतात. विशिष्ट वर्ष आधार मानुन त्यानंतरच्या वर्षातील औद्योगिक उत्पादनात होणारी वाढ किंवा घट या निर्देशांकाद्वारे स्पष्ट करता येते. हे निर्देशांक औद्योगिक प्रगतीचे मूल्यमापन करून वस्तुच्या उपलब्धतेसंबंधी मार्गदर्शन करतात. राज्याचे औद्योगिक धोरण निश्चित करण्याच्या दृष्टीने तसेच राज्य उत्पन्न काढण्यासाठी औद्योगिक उत्पादन निर्देशांक परिगणित करणे आवश्यक ठरते. औद्योगिक उत्पादन निर्देशांक भौगोलिक क्षेत्रातील औद्योगिक प्रगतीचे मापन करणारे महत्वाचे साधन आहे.

केंद्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या तांत्रिक सल्लागार समितीच्या शिफारशीनुसार सर्व राज्यांनी एकसमान कार्यपध्दती म्हणजे १) वस्तू निवडसूची व वस्तुभार यांच्या पध्दती २) निर्देशांक प्रकाशित करावयाची नियमितता ३) पायाभूत वर्ष निवड या सर्व बाबी राज्यासाठी समान असणे आवश्यक आहे. त्यासाठी केंद्रीय सांख्यिकी कार्यालयाने वस्तुसूची भार, कारखाने या विषयक माहिती सर्व राज्यासाठी उपलब्ध करून दिलेली आहे. या माहितीच्या आधारावर राज्य औद्योगिक उत्पादन निर्देशांक (State Index of Industrial Production) परिगणित करावयाचा आहे.

केंद्र शासनाच्या भारतीय सांख्यिकी व्युहरचना आराखडा ISSP प्रकल्पांतर्गत राज्यांनी त्यांचा राज्य सांख्यिकी व्युहरचना आराखडा (State Strategic Statical Plan) तयार करताना ठरवून दिलेल्या २० प्रमुख सांख्यिकीय कार्यापैकी औद्योगिक उत्पादन निर्देशांक हे एक प्रमुख कार्य आहे. औद्योगिक उत्पादन निर्देशांक हे देशातील / राज्यातील औद्योगिक प्रगती दर्शविणारे मापन आहे.

त्याअनुषंगाने औद्योगिक प्रगतीचे मूल्यमापन करण्याकरीता केंद्र शासनाने अवलंबलेल्या पध्दतीनुसार अर्थ व सांख्यिकी संचालनालयामार्फत महाराष्ट्र राज्यासाठी औद्योगिक उत्पादन निर्देशांक परिगणित करून तो नियमितपणे प्रकाशित करण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी अर्थ व सांख्यिकी संचालनालय स्तरावर एक समिती गठीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:

राज्य स्तरावर औद्योगिक उत्पादन निर्देशांक, पायाभूत वर्ष २०११-१२ परिगणित करून नियमितपणे प्रकाशित करण्याकरीता तसेच संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे :-

(अ) **समितीची रचना**

अ. क्र.	नाव	पदनाम
१	संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई	अध्यक्ष
२	उप सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई	सदस्य
३	संचालक, केंद्रीय सांख्यिकी कार्यालय,(उद्योग सांख्यिकी) दिल्ली	तज्ञ सदस्य
४	उप सचिव (उद्योग) उद्योग ऊर्जा व कामगार विभाग,	सदस्य
५	इंदिरा गांधी संशोधन व विकास संस्था, गोरेगाव, मुंबई	तज्ञ सदस्य
६	सह संचालक, उद्योग संचालनालय, मुंबई	सदस्य
७	सहसंचालक (समन्वय) अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई	सदस्य
८	सह संचालक, (राउ) अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई	सदस्य
९	उप संचालक, (अवि), अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई	सदस्य सचिव

(ब) **समितीची कार्यकक्षा** :-

१. केंद्र शासनाने उपलब्ध करून दिलेल्या बाबींच्या आधारे प्राप्त माहिती ही आर्थिक, भौगोलिक व सामाजिक स्तरावर विभीन्न नसल्याची खातरजमा करून त्याबाबत कार्यपध्दती निश्चित करून माहिती नोंदणी करणे.

२. औद्योगिक उत्पादन निर्देशांक परिगणित करण्याची कार्यपध्दती ठरविणे.

३. औद्योगिक उत्पादन निर्देशांक प्रकाशित करावयाची नियमितता पाळणे.

(क) **समितीचा कार्यकाल** :

समितीचा कालावधी ३ महिने इतका राहील. सदस्यांना नियमानुसार अनुज्ञेय असलेला भत्ता व मानधन देण्यात येईल.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७१११६११३७५३६८१६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Priyanka Ranjan Chhapwale

Digitally signed by Priyanka Ranjan Chhapwale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2295c5c50b6a2aa03b2654fd2f5f69a709a20ae44359c483f3e1b0d4450728d0, cn=Priyanka Ranjan Chhapwale
Date: 2017.11.16 11:41:19 +05'30'

(प्रियांका रं. छापवाले)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१) मा. विरोधी पक्ष नेते, विधान सभा / विधान परिषद, विधान भवन, मुंबई-३२
२) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
४) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई-३२
५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई-२३
६) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई-२३
७) अधिदान व लेखा अधिकारी, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई-५१
८) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
९) प्रधान सचिव यांचे स्वीय सहायक, नियोजन विभाग मंत्रालय, मुंबई-३२
१०) निवड नस्ती (का-१४१७), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.